


नूतन मराठा महाविद्यालय


नूतन मराठा महाविद्यालय
तन मराठा महाविद्यालय, जळगांव
सर्वांचे हार्दिक स्वागत
करीत आहोत


नूतन मराठा महाविद्यालय
मराठा महाविद्यालय, जळगांव
सर्वांचे हार्दिक स्वागत
करीत आहोत

लोकमत

# नूतन मराठा महाविद्यालय विजयी

## आंतरमहाविद्यालयीन मल्लखांब स्पर्धा : वरणगाव दुसऱ्या स्थानावर

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वरणगाव येथे नुकत्याच झालेल्या जळगाव विभागस्तरीय आंतरमहाविद्यालयीन मल्लखांब स्पर्धेत जळगावच्या नूतन मराठा महाविद्यालयाने जेतेपद पटकावले. तर यजमान कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वरणगाव संघाने दुसरे स्थान मिळवले. रावेरच्या व्ही.एस. नाईक महाविद्यालयाला तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. स्पर्धेतून अव्वल सहा खेळाडूंची निवड विद्यापीठाच्या विभागस्तरीय स्पर्धेसाठी करण्यात आली आहे.

स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य राजेंद्र वाघ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य प्रा. अनिल शिंदे, जळगाव विभाग क्रीडा समिती सचिव प्रा. डॉ. पी.आर. चौधरी उपस्थित होते. निवड समिती सदस्या म्हणून प्रा. मुकेश पवार, प्रा.सुभाष वानखेडे, प्रा.डॉ. अमोल पाटील, नाईक महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा. उमेश पाटील उपस्थित होते.

पंच म्हणून लक्ष्मीकांत नेमाडे आणि सचिन चौधरी यांनी काम पाहिले.

यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य पी.बी. देशमुख, प्रा.एन.एस. थांडे, प्रा. अजित कलावते, प्रा. विजय पवार, प्रा राहुल जोहरे, प्रा. रुपा कुलकर्णी, प्रा.जयंत जोशी यांनी सहकार्य केले.



**विजयी खेळाडूंसह प्रा. सुभाष वानखेडे , प्रा. अनिल शिंदे , प्रा.पी.आर. चौधरी, प्रा.अमोल पाटील, प्रा.मुकेश पवार, प्रा.उमेश पाटील.**

### निवड झालेले खेळाडू

**ज्ञानेश्वर जाधव, नूतन मराठा महाविद्यालय, भूषण तेली, भूषण सुरवाडे, वरणगाव महाविद्यालय, योगेश वळवी, नूतन मराठा महाविद्यालय, आसीफ तडवी, भाईदास पावरा, व्ही.एस.नाईक महाविद्यालय, रावेर,**

सूत्रसंचालन प्रा.सुभाष वानखेडे यांनी केले.

# हार्टफुलनेस एज्युकेशनल ट्रस्ट, नूतन मराठा महाविद्यालयात सामंजस्य करार

**प्रतिनिधी** । जळगाव

नूतन मराठा महाविद्यालय जळगाव व हार्टफुलनेस एज्युकेशनल ट्रस्ट यांच्यात बुधवारी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास तसेच महाविद्यालयीन कर्मचारी व विद्यार्थ्यांचा मानसिक व आध्यात्मिक आरोग्यासाठी फायदेशीर ठरेल.



सामंजस्य करार करताना प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख व डॉ. विकास देव. सोबत प्रा. डॉ. माधुरी पाटील, प्रा. ए. वाय. बडगुजर, प्रा. डॉ. के. बी. पाटील.

नूतन मराठा महाविद्यालयात बहुसंख्य ग्रामीण भागातील विद्यार्थी असून या सामंजस्य कराराद्वारे विद्यार्थी व महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी मानसिक, आध्यात्मिक, आरोग्य कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार आहे. या सामंजस्य करारावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. पी. देशमुख यांनी तर हार्टफुलनेसतर्फे विभागीय समन्वय डॉ. विकास देव यांनी स्वाक्षऱ्या केल्या. हार्टफुलनेस ट्रस्टचे जागतिक मुख्यालय हैदराबाद येथे असून १६० देशांत विस्तार आहे. पदवी आणि पदव्युत्तर साठी इंडक्शन प्रोग्राम, स्टार्टअप, लीडरशिप मास्टरी प्रोग्राम आणि मेडिटेशन कॅम्पचे आयोजन केले जाते. करारावर स्वाक्षरी करताना देशमुख यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकडे कौशल्य आहे. हार्टफुलनेसच्या उपक्रमांमुळे त्यांचे कौशल्य विकसित होतील असे सांगितले. प्रा. डॉ. माधुरी पाटील, प्रा. ए. वाय. बडगुजर, प्रा. डॉ. के. बी. पाटील, डॉ. नीलम अग्रवाल, मीनाक्षी पाटील, सुनीता पाटील, गिरीश मुंदडा, कर्नल उत्तम पाटील, अपूर्वा अग्रवाल व शिक्षक, प्राध्यापक आदी उपस्थित होते.